चाणक्य मंडल परिवार

**प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT000**

**BOOKLET No.**

**प्रश्नपुस्तिका**

**POLITY**

**वेळ : 1 (एक) तास**

**एकूण प्रश्न : 50**

**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(2) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

(3) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.**

(5) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(8) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील''.**

(9) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

चाणक्य मंडल परिवार

1. खालीलपैकी अचूक विधाने कोणते?

अ) भारत सरकार कायदा, 1935 मध्ये प्रामुख्याने 14 भाग, 321 कलमे व 10 परिशिष्टे समाविष्ट होती.

ब) या कायद्याप्रमाणे अस्तित्वात आलेल्या मुंबई प्रांताच्या विधान परिषदेची पहिली सभा 20 जुलै 1937 रोजी पुणे येथे झाली.

क) या कायद्यान्वये सिंध आणि ओरिसा ही दोन नवीन प्रांत निर्माण झाले.

ड) या कायद्याने भारत मंत्र्याचा पगार ब्रिटनच्या तिजोरीतून देण्याचे ठरले.

पर्यायी उत्तरे:

1) अ, ब, क 2) ब, क, ड

3) अ आणि क 4) वरीलपैकी सर्व

Which of the following statements are correct?

a) The Government of India Act, 1935 mainly consisted of 14 parts, 321 articles and 10 schedules.

b) The first meeting of the Legislative Council of Bombay Province which came into force under this Act was held on 20 July 1937 at Pune.

c) Under this Act, two new provinces Sindh and Orissa were created.

d) This Act decided to pay the salary of the Secretary of State from the British treasury.

Answers Options:

1) a, b, c 2) b, c, d

3) a and c 4) All of the above

---

2. मॉर्ले-मिंटो सुधारणा कायद्याविषयी खालील विधाने विचारात घ्या.

अ) या कायद्यानुसार सत्येंद्र प्रसाद सिन्हा यांची व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात कायदा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

ब) या कायद्यानुसार गुरूप्रसाद बॅनर्जी आणि सय्यद हुसेन बिलग्रामी यांची भारतमंत्र्याच्या काऊन्सिलवर नियुक्ती करण्यात आली.

पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ योग्य 2) फक्त ब योग्य

3) दोन्ही विधाने योग्य 4) दोन्ही विधाने अयोग्य

Consider the following statements about the Morley-Minto Reforms Act.

a) According to this Act, Satyendra Prasad Sinha was appointed as Law Member in the Viceroy's Executive Council.

b) Under this Act, Guru Prasad Banerjee and Syed Hussain Bilgrami were appointed on the Council of Secretary of State

Answer Options:

1) Only a is correct 2) Only b is correct

3) Both statements are correct 4) Both statements are incorrect



चाणक्य मंडळ परिवार

3. खालीलपैकी कोणत्या कायद्याने प्रथमच केंद्रीय विधीमंडळात भारतीयांना स्थानिक प्रतिनिधित्व दिले?

1) सनदी कायदा, 1833 2) सनदी कायदा, 1853
3) भारत सरकार कायदा, 1861 4) भारत सरकार कायदा, 1909

Which of the following Act gave local representation to Indians in the Union Legislature for the first time?

1) Charter Act, 1833 2) Charter Act, 1853
3) Government of India Act, 1861 4) Government of India Act, 1909

---

4. 1773 च्या नियामक कायद्याविषयी खालीलपैकी असत्य विधान कोणते?

1) या कायद्यान्वये प्रथमच कंपनीच्या राजकीय व प्रशासकीय कार्यांना मान्यता दिली गेली.
2) कंपनीच्या कर्मचाऱ्यांना खाजगी व्यापार करण्यास, लाच तसेच भेटवस्तू स्विकारण्यास बंदी घालण्यात आली.
3) भारतातील कंपनीच्या क्षेत्राला "ब्रिटिश ताब्यातील क्षेत्र" असे संबोधले जाऊ लागले.
4) यापैकी नाही.

Which of the following statements about the Regulating Act, 1773 is false?

1) Political and administrative functions of the Company were recognized for the first time under this Act.
2) Company employees were prohibited from private trade, accepting bribes and gifts.
3) The Company's territory in India came to be called "British Possession".
4) None of these

---

5. खालील तरतुदी कोणत्या कायद्याशी संबंधित आहेत?

अ) पूर्ण ब्रिटिश भारतासाठी कायदे करण्याचा अधिकार भारताच्या गव्हर्नर जनरलला देण्यात आले.
ब) या कायद्यापूर्वीच्या कायद्यांनुसार बनविण्यात आलेल्या कायद्यांना 'नियम' व या कायद्यानुसार केलेल्या कायद्यांना 'कायदे' म्हणण्यात आले.
क) या कायद्याने नागरी सेवकांच्या निवडीसाठी मुक्त स्पर्धात्मक पद्धती आणण्याचा प्रयत्न केला.

1) सनदी कायदा, 1833 2) सनदी कायदा, 1853
3) भारत सरकार कायदा, 1853 4) भारत सरकार कायदा, 1961

Which Act relates to the following provisions?

a) Power to legislate for the whole of British India was given to the Governor General of India.
b) Acts made under previous Acts were called as 'Rules' and Acts made under this Act called as 'Acts'.
c) This Act sought to introduce free competitive methods for the selection of civil servants.

1) Charter Act, 1833 2) Charter Act, 1853
3) Government of India Act, 1853 4) Government of India Act, 1961

6. 1909 च्या भारत सरकार कायद्याविषयी खालीलपैकी असत्य विधान/ने कोणते/ ती?

अ) या कायद्यान्वये केवळ केंद्रीय कायदेमंडळाचा आकार वाढविण्यात आला.

ब) निवडून आलेल्या भारतीय निवडून आलेल्या भारतीय सदस्यांना पुरक प्रश्न विचारण्याचा, ठराव मांडण्याचा, अर्थ संकल्पावर चर्चा व मतदान करण्याचा अधिकार देण्यात आला.

क) या कायद्यान्वये सांप्रदायिकतेला कायदेशीर स्वरूप मिळाले.

1) यापैकी नाही
2) केवळ अ
3) केवळ ब
4) अ आणि ब

Which of the following statement/s is/are false about the Government of India Act, 1909?

a) Only the size of the Central Legislature was increased under this Act.

b) The elected Indian members were empowered to ask supplementary questions, move resolutions, debate and vote on the budgetary resolution.

c) Communalism was legalised under this Act.

1) None of these
2) Only a
3) Only b
4) a and b

---

7. 1858 च्या भारत सरकार कायद्याविषयी खालील विधाने विचारात घ्या.

अ) या कायद्यानुसार 1773 मध्ये सुरू झालेल्या दुहेरी शासन पद्धतीचा अंत झाला.

ब) भारतमंत्र्याला सहाय्य करण्यासाठी सल्लागारी स्वरूपाची ‘इंडिया कौन्सिल‘ ची स्थापना करण्यात आली.

पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ योग्य
2) फक्त ब योग्य
3) दोन्ही विधाने योग्य
4) दोन्ही विधाने अयोग्य

Consider the following statements regarding the Government of India Act, 1858.

a) This act brought to an end the dyarchy system of government which had started in 1773.

b) An advisory body called 'India Council' was set up to assist the Secretary of State.

Answer Options:

1) Only a is correct
2) Only b is correct
3) Both statements are correct
4) Both statements are incorrect

---



चाणक्य मंडल परिवार

8. 1935 च्या भारत सरकार कायद्याचे प्रमुख स्रोत कोणते?

अ) सायमन कमिशनचा अहवाल

ब) नेहरू अहवाल

क) तिन्ही गोलमेज परिषदांची श्वेतपत्रिक

ड) संयुक्त निवड समितीचा अहवाल

इ) मूडिमन अहवाल

पर्यायी उत्तरे:

1) ब वगळता 2) अ, क, ड

3) इ वगळता सर्व 4) वरीलपैकी सर्व

What are the major sources of the Government of India Act, 1935?

a) Report of Simon Commission

b) Nehru Report

c) White papers of all three round table conferences

d) Joint Selection Committee Report

e) Moodyman Report

Answers Options:

1) All Except b 2) a, c, d

3) All except e 4) All of the above

---

9. खालील विधाने विचारात घ्या:

अ) पिट्स इंडिया कायद्यानुसार, गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलची सदस्य संख्या तीनपर्यंत कमी करण्यात आली.

ब) पिट्स इंडिया कायद्यानुसार कंपनीची भारतीय व्यापारातील मक्तेदारी संपुष्टात आली.

क) पिट्स इंडिया कायद्याद्वारे ब्रिटीश अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि बदली करण्याचे अधिकार ईस्ट इंडिया कंपनीकडे कायम ठेवण्यात आले.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ ने चुकीचे नाही/ नाहीत?

1) फक्त अ आणि ब 2) फक्त क

3) फक्त अ आणि क 4) फक्त ब

Consider the following statements regarding Pitts India Act, 1784.

a) By Pitt's India Act, the members of the Governor General's Council were reduced upto three.

b) Pitt's India Act abolished the monopoly of the Company's trade in India.

c) Through this Act, the right to appoint and transfer British officials was retained by the East India Company.

Which of the above statements is/ are not incorrect?

1) Only a and b 2) Only c

3) Only a and c 4) Only b

10. पुढीलपैकी कोणत्या वर्षी लॉर्ड कॅनिंगने "खातेनिहाय" प्रणालीची सुरूवात केली?

1) 1858  2) 1859
3) 1860  4) 1861

In which of the following year Lord Canning established the “portfolio” system?

1) 1858  2) 1859
3) 1860  4) 1861

---

11. भारत सरकार कायदा, 1919 विषयी खालीलपैकी चूक विधाने कोणती?

1) 1919 च्या कायद्यान्वये केंद्रात प्रथमच द्विगृही कायदेमंळाची निर्मिती करण्यात आली.
2) कनिष्ठ सभागृहात 250 सदस्य, तर वरीष्ठ सभागृहात एकूण 60 सदस्य होते.
3) या कायद्या अंतर्गत मालमत्ता कर आणि शिक्षण या आधारावर मर्यादित लोकांना मताधिकार देण्यात आला.
4) वरील सर्व विधाने अचूक आहेत.

Which of the following statements is incorrect about the Government of India Act, 1919?

1) Bicameral legislature was created for the first time at centre under the Act of 1919.
2) Central legislative assembly had 250 members while the council of state had a total of 60 members.
3) Under this act right to vote was given to a limited number of people on the basis of property tax and education.
4) All the above statements are correct.

---

12. खालीलपैकी कोणत्या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने 'भारतीय राज्यघटना मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांच्यातील संतुलनाच्या पायावर आधारित आहे', यावर जोर दिला आहे?

1) गोलकनाथ खटला (1967)
2) केशवनंद भारती खटला (1973)
3) मनेका गांधी खटला (1978)
4) मिनर्व्हा मिल खटला (1980)

In which case, does the Supreme Court emphasizes that 'the Indian Constitution is founded on the bedrock of the balance between the Fundamental Rights and the Directive Principles'?

1) Golaknath Case (1967)
2) Kesavananda Bharati Case (1973)
3) Maneka Gandhi Case (1978)
4) Minerva Mill Case (1980)



चाणक्य मंडल परिवार

13. भारतीय स्वातंत्र्याचा कायदा, 1947 नुसार खालीलपैकी कोणते विधान गैरलागू आहे?

1) भारतीय स्वातंत्र्य विधेयक 3 जून 1947 रोजी ब्रिटिश संसदेत मांडण्यात आले.
2) विधेयकांबाबत नकाराधिकार वापरण्याचा किंवा काही विधेयकांसाठी संमती राखून ठेवण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आला.
3) नवीन राज्यघटना तयार होईपर्यंत कायदे करण्याचा अधिकार संविधान सभेला देण्यात आला.
4) यापैकी नाही.

According to the Indian Independence Act, 1947 which of the following statements is invalid?

1) The Indian Independence Bill was introduced in the British Parliament on 3 June 1947.
2) Governor General was empowered to veto bills or to withhold assent to certain bills.
3) Power to legislate was given to the Constituent Assembly until a new constitution was framed.
4) None of these.

---

14. अंतरिम सरकारातील खातेनिहाय मंत्र्यांच्या जोड्या खाली दिल्या आहेत, त्यापैकी चुकीची जोडी ओळखा.

1) वित्त मंत्री - लियाकत अली खान
2) शिक्षण मंत्री - सी. राजगोपालाचारी
3) कायदा मंत्री - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
4) (2) आणि (3)

Pairs of the Department and their respective Ministers in the Interim Government are below. Identify the wrong pair.

1) Finance Minister – Liaquat Ali Khan
2) Minister of Education - C. Rajagopalachari
3) Law Minister - Dr. Babasaheb Ambedkar
4) (2) and (3)

---

15. अ) अंतरिम सरकारमधील सदस्य व्हॉईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य होते.

ब) या कार्यकारी परिषदेच्या अध्यक्षस्थानी जवाहरलाल नेहरू होते.

पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ अयोग्य
2) फक्त ब अयोग्य
3) दोन्ही विधाने योग्य
4) दोन्ही विधाने अयोग्य

a) Members of the Interim Government were members of the Viceroy's Executive Council.

b) This executive council was chaired by Jawaharlal Nehru.

Answer Options:

1) Only a is incorrect
2) Only b is incorrect
3) Both statements are correct
4) Both statements are incorrect



चाणक्य मंडल परिवार

16. भारत सरकार कायदा, 1935 संबंधित खालील विधाने विचारात घ्या.

अ) या कायद्यान्वये राज्यपालाचे पद स्थापन केले गेले; केंद्राचे सर्व कार्यकारी अधिकार राज्यपालांकडे निहित होते.

ब) या कायद्यात प्रांत आणि संस्थाने हे घटक असलेले 'अखिल भारतीय संघराज्य' स्थापन करण्याची तरतूद होती.

क) 'कौन्सिल ऑफ स्टेट' या वरिष्ठ सभागृहाची सदस्य संख्या 260 पर्यंत वाढविण्यात आली.

ड) 'फेडरल असेंब्ली' या कनिष्ठ सभागृहाचा कार्यकाळ पाच वर्षांपर्यंत, तर सदस्य संख्या 375 पर्यंत वाढविण्यात आली.

वरीलपैकी असत्य विधान/ विधाने कोणती?

पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ असत्य
2) ड आणि क असत्य
3) अ आणि क सत्य
4) यापैकी नाही

Consider the following sentences regarding Government of India Act, 1935.

a) The act established the office of the Governor; all the executive powers and authority of the centre was vested in the Governor.

b) The act suggested the establishment of a ‘Federation of India’ consisting of the provinces of British India and most of the princely states.

c) The number of members of the upper house, 'Council of State', was increased to 260.

d) The tenure of the lower house, 'Federal Assembly', was increased to five years, while the number of members was increased to 375.

Which of the above statement/s is/ are false?

Answer Options:

1) Only a is false
2) d and c are false
3) a and c are true
4) None of these

---

17. खालीलपैकी स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला कॅबिनेट मंत्री कोण होत्या?

1) सुचेता कृपलानी
2) सरोजिनी नायडू
3) राजकुमारी अमृत कौर
4) विजया राजे सिंधिया

Who among the following was the first woman cabinet minister of independent India?

1) Sucheta Kripalani
2) Sarojini Naidu
3) Rajkumari Amrit Kaur
4) Vijaya Raje Sindiya

---

18. भारतातील साम्यवादी चळवळीचे प्रणेते मानवेंद्र नाथ रॉय यांनी _______ साली प्रथमतः घटना समितीची संकल्पना मांडली.

1) 1934
2) 1935
3) 1932
4) 1940

Manvendra Nath Roy, the pioneer of communist movement in India, first proposed the concept of Constituent Assembly in _______

1) 1934
2) 1935
3) 1932
4) 1940



चाणक्य मंडल परिवार

19. अ) लॉर्ड पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफोर्ड क्रिप्स व ए. व्ही. अलेक्झांडर यांचे त्रिसदस्यीय कॅबिनेट मिशन 16 मे 1946 रोजी भारतात आले.

ब) कॅबिनेट मिशन योजनेनुसार नोव्हेंबर 1946 मध्ये संविधान सभेची स्थापना करण्यात आली.
पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ चूक
2) अ आणि ब बरोबर
3) अ आणि ब चूक
4) फक्त ब चूक

a) Lord Pathick Lawrence, Sir Stafford Cripps and A. V. Alexander's three-member Cabinet Mission arrived in India on 16 May 1946.

b) Constituent Assembly was constituted in November 1946 as per Cabinet Mission.

Answer Options:

1) Only a is incorrect
2) a and b are correct
3) a and b are incorrect
4) Only b is incorrect

---

20. संविधान सभेच्या संदर्भात, खालीलपैकी कोणती निरीक्षणे बरोबर आहे/आहेत?

1) संविधान सभेचे सदस्य अप्रत्यक्षपणे निवडले गेले होते.
2) संविधान सभेत पंधरा महिलांसह 389 प्रतिनिधी होते.
3) संविधान सभेची रचना साधारणपणे कॅबिनेट मिशन योजनेच्या शिफारशींशी सुसंगत होती.
4) वरील सर्व.

In context with the Constituent Assembly, which among the following observations is/ are correct?

1) The members of the Constituent Assembly were elected indirectly.
2) The Constituent Assembly had 389 representatives, including fifteen women.
3) Composition of the Constituent Assembly was roughly in line with the suggestions of the Cabinet Mission plan.
4) All of the above.

---

21. योग्य जोड्या जुळवा.

| पक्ष | जागा |
|---|---|
| अ) घटना समितीतील एकूण जागा | i) 389 |
| ब) काँग्रेस | ii) 93 |
| क) युनियनिस्ट पक्ष | iii) 208 |
| ड) मुस्लिम लीग | iv) 73 |
| | v) 1 |

पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | i | iii | v | ii |
| 2) | i | ii | v | iv |
| 3) | i | iii | v | iv |
| 4) | i | ii | v | iv |

Match the correct pairs.

| Party | Seats |
|---|---|
| a) Total seats in the Constituent Assembly | i) 389 |
| b) Congress | ii) 93 |
| c) Unionist Party | iii) 208 |
| d) Muslim League | iv) 73 |
| | v) 1 |

Answer Options:

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| 1) | i | iii | v | ii |
| 2) | i | ii | v | iv |
| 3) | i | iii | v | iv |
| 4) | i | ii | v | iv |

---

22. खालील विधाने विचारात घ्या.

अ) घटना समितीमध्ये एस. एन. मुखर्जी हे मसुदा बनविण्याचे प्रमुख होते.

ब) एन. गोपालस्वामी अय्यंगार हे घटना समितीचे सचिव होते.

क) हिंदी भाषेतील मूळ राज्यघटनेचे हस्तलिखित प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी बनविले आहे.

1) फक्त अ चूक
2) ब आणि क चूक
3) फक्त ब चूक
4) फक्त क चूक

Consider the following statements.

a) In the Constitution Committee S. N. Mukherjee was the chief draftsman.

b) N. Gopalaswamy Ayyangar was the Secretary of the Constitution Committee.

c) Manuscript of the original constitution in Hindi language was made by Prem Bihari Narayan Rayzada.

1) Only a is wrong
2) Both b and c are wrong
3) Only b is wrong
4) Only c is wrong



चाणक्य मंडल परिवार

23. वेगवेगळ्या टीकाकारांनी वेगवेगळ्या कारणांनी घटना समितीवर टीका केली आहे. त्यासंदर्भात कोणते/ ती विधान/ विधाने योग्य आहेत?

1) लॉर्ड विस्काऊंट यांनी घटना समितीस 'हिंदूंची सभा' असे म्हटले आहे.
2) ग्रॅनविल ऑस्टिन यांनी घटना समितीस 'हिंदूंची सभा' असे म्हटले आहे.
3) 'घटना समिती म्हणजे काँग्रेस व काँग्रेस म्हणजे भारत' अशी टीका ग्रॅनविल ऑस्टिन यांनी केली आहे.
4) 1 आणि 3 बरोबर आहेत.

Different commentators have criticized the Constitutional Committee for different reasons. Which statement/s is/ are correct regarding it?

1) Lord Viscount called the Constituent Assembly the 'Assembly of Hindus'.
2) Granville Austin called the Constituent Assembly the 'Assembly of Hindus'.
3) Granville Austin criticized that 'Constitutional Committee means Congress and Congress means India'.
4) 1 and 3 are correct.

---

24. घटना समितीला राज्यघटनेचा अंतिम मसुदा कधी सादर करण्यात आला?

1) 4 नोव्हेंबर 1948
2) 26 नोव्हेंबर 1948
3) 26 नोव्हेंबर 1949
4) 17 नोव्हेंबर 1948

When was the final draft of the Constitution submitted to the Constituent Assembly?

1) 4 November 1948
2) 26 November 1948
3) 26 November 1949
4) 17 November 1948

---

25. खालीलपैकी अचूक नसलेली/ नसलेल्या जोडी/ जोड्या कोणती/ कोणत्या?

अ) 22 जुलै 1947 : राष्ट्रध्वजाचा स्वीकार
ब) 29 ऑगस्ट 1947 : मसुदा समितीची स्थापना
क) मे 1948: भारताच्या राष्ट्रकुल सदस्यत्वाला मान्यता
ड) 26 नोव्हेंबर 1949 : घटनेची स्वीकृती
इ) 24 जानेवारी 1950 : राष्ट्रगीत आणि राष्ट्रगानचा स्वीकार

1) ब आणि क
2) फक्त क
3) अ आणि इ
4) यापैकी नाही

Which of the following is/ are not correct pair/ pairs?

a) 22 July 1947 : Adoption of National Flag
b) 29 August 1947 : Establishment of Drafting Committee
c) May 1948: Recognition of India's Commonwealth membership
d) 26 November 1949 : Adoption of Constitution
e) 24 January 1950 : Adoption of National Anthem and National song

1) b and c
2) Only c
3) a and e
4) None of these



चाणक्य मंडल परिवार

26. राज्यघटनेतील पुढील तरतूदी घटना स्विकृत केल्यापासूनच लागू करण्यात आल्या -

अ) नागरिकत्व
ब) निवडणुका
क) राष्ट्रपती शपथ
ड) हंगामी संसद
इ) वित्त आयोग
फ) आकस्मिक प्रसंगी राष्ट्रपतीचे अधिकार

1) अ, ब, क, ड, फ
2) अ, ब, ड, फ
3) अ, ब, ड, इ, फ
4) वरील सर्व

The following provisions of the Constitution came into force from the date of adoption of the Constitution-

a) Citizenship
b) Elections
c) Presidential Oath
d) Provisional Parliament
e) Finance Commission
f) Powers of the President in case of emergency

1) a, b, c, d, f
2) a, b, d, f
3) a, b, d, e, f
4) All of the above

---

27. खालीलपैकी बरोबर असलेले विधान ओळखा.

1) घटना समितीच्या पहिल्या अधिवेशनात 'उद्दिष्टांच्या ठराव' मांडण्यात आला व एकमताने संमत करण्यात आला.
2) भारत हे स्वतंत्र, सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि प्रजासत्ताक राज्य असेल, अशी तरतूद या उद्दिष्टांच्या ठरावात होती.
3) या ठरावातून घटनेच्या संरचनेचे तत्वज्ञान व मूलगामी विचार व्यक्त होतात.
4) वरील सर्व विधाने बरोबर आहेत.

Identify the correct statement among the following.

1) In the first session of the Constitution Committee, the 'Objectives Resolution' was proposed and passed unanimously.
2) The 'Objectives Resolution' stipulated that ‘India would be an independent, sovereign, secular, democratic and republican state’.
3) This resolution expresses the philosophy and radical thoughts of constitution structure.
4) All the above statements are correct.



चाणक्य मंडळ परिवार

28. संविधान सभेत 15 महिलांचा सहभाग होता, त्यांची नावे व त्या ज्या मतदारसंघातून निवडून आल्या होत्या यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| **महिला सदस्य** | **मतदार संघ** |
|---|---|
| अ) दुर्गाबाई देशमुख | i) मुंबई |
| ब) ॲनी मॅस्करीन | ii) ओरिसा |
| क) हंसा मेहता | iii) त्रावणकोर |
| ड) मालती चौधरी | iv) मद्रास प्रांत |

पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | ii | i |
| 2) | i | ii | iv | iii |
| 3) | i | iv | ii | iii |
| 4) | iv | iii | i | ii |

There were 15 women in the Constituent Assembly, match their names and the constituencies from which they were elected.

| **Women Member** | **Constituency** |
|---|---|
| a) Durgabai Deshmukh | i) Mumbai |
| b) Anne Mascarene | ii) Orissa |
| c) Hansa Mehta | iii) Travancore |
| d) Malti Chaudhary | iv) Madras Province |

Answer Options:

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | ii | i |
| 2) | i | ii | iv | iii |
| 3) | i | iv | ii | iii |
| 4) | iv | iii | i | ii |

---

29. मसुदा समितीसंबंधित खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
1) मसुदा समितीत एक अध्यक्ष व इतर सहा सदस्य होते.
2) मसुदा समितीचे सदस्य असलेल्या एन. गोपालस्वामी अय्यंगार यांनी कलम 370 चा मसुदा तयार केला होता.
3) मसुदा समितीचे सदस्य असलेले टी. टी. कृष्णम्माचारी हे संविधान सभेचे उपाध्यक्षही होते.
4) मसुदा समितीचे कामकाज एकूण 141 दिवस चालले.

Which of the following statements regarding the Drafting Committee is incorrect?
1) The Drafting Committee consisted of a Chairman and six other members.
2) Article 370 was drafted by N. Gopalaswamy Iyengar, who was a member of the drafting committee.
3) T. T. Krishnammachari, a member of the Drafting Committee, was also the Vice President of the Constituent Assembly.
4) The working of the Drafting Committee lasted for a total of 141 days.



चाणक्य मंडल परिवार

30. कॅबिनेट मिशन योजनेनुसार संविधान सभेची रचना खालीलप्रमाणे करण्यात आली.

अ) ब्रिटिश भारतातील 389 जागांपैकी 292 जागांसाठी 11 प्रांतांमध्ये 1935 च्या कायद्यानुसार निवडणूका घेण्यात आल्या.

ब) 93 जागा संस्थानिकांसाठी होत्या.

क) दिल्ली, अजमेर- मारवाड, कूर्ग, बलुचिस्तान या चार मुख्य आयुक्तांच्या प्रांतांमधून प्रत्येकी एक जागा नामनिर्देशित करायची होती.

वरीलपैकी अयोग्य विधान ओळखा.

पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ
2) फक्त ब
3) फक्त क
4) यापैकी नाही

According to the Cabinet Mission Plan, the Constituent Assembly was structured as follows.

a) Elections were held under the 1935 Act in 11 provinces for 292 seats out of 389 seats in British India.

b) 93 seats were for princely states.

c) One seat each was to be nominated from the four Chief Commissioner provinces such as Delhi, Ajmer-Marwar, Coorg and Baluchistan.

Identify the incorrect statement from the above.

Answers Options:

1) Only a
2) Only b
3) Only c
4) None of these

चाणक्य मंडल परिवार

31. 1947 च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्याने घटना सभेच्या स्थानामध्ये बदल झाला. त्यासंदर्भात कोणते/ ती विधान/ विधाने अयोग्य आहे/ आहेत?

अ) संविधान सभेला अंशतः सार्वभौम दर्जा देण्यात आला.

ब) संविधान सभेला कायदेमंडळाचा दर्जा देण्यात आला.

क) जी. व्ही. मावळंकर यांच्या अध्यक्षतेखाली 17 नोव्हेंबर 1947 रोजी घटना समिती पहिल्यांदा विधीमंडळ म्हणून भरली.

पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ
2) फक्त क
3) फक्त अ आणि क
4) यापैकी नाही

The Indian Independence Act, 1947 changed the status of the Constituent Assembly. Which statement/s is/are incorrect in that regard?

a) The Constituent Assembly was given partially sovereign status.

b) The Constituent Assembly was given the status of a legislature.

c) The Constitution Assembly met as a legislature for the first time on 17 November 1947 under the chairmanship of G. V. Mavlankar.

Answer Options:

1) Only a
2) Only c
3) Only a and c
4) None of these

---

32. डॉ. राजेंद्र प्रसाद हे पुढीलपैकी कोणत्या समितींचे अध्यक्ष होते?

अ) सुकाणू समिती

ब) कामकाज प्रक्रिया नियम समिती

क) गृह समिती

ड) वित्त व कर्मचारी समिती

इ) राष्ट्रध्वजासंबंधी हंगामी समिती

फ) राज्यांसोबत वाटाघाटी करणारी समिती

1) क आणि फ वगळता सर्व
2) वरील सर्व
3) फ वगळता सर्व
4) अ वगळता सर्व

Dr. Rajendra Prasad was the chairman of which of the following committees?

a) Steering Committee

b) Working Procedure Rules Committee

c) Home Committee

d) Finance and Personnel Committee

e) Interim Committee on National Flag

f) Negotiating Committee with States

1) All except c
2) All of the above
3) All except f
4) All except a

33. कोणत्या समित्यांमध्ये डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी सदस्य म्हणून कार्य केले आहे?

अ) मुलभूत अधिकार उपसमिती

ब) अल्पसंख्याक उपसमिती

क) प्रांतिक घटना समिती

ड) संघराज्य घटना समिती

इ) संघराज्य अधिकार समिती

फ) सल्लागार समिती

1) अ, ब, क, ड, इ, फ
2) अ, ब, ड, इ, फ
3) अ, ब, क, ड, इ
4) अ, ब, क, ड, फ

In which committees Dr. B. R. Ambedkar has served as a member of?

a) Sub-Committee on Fundamental Rights

b) Sub-Committee on Minority

c) Provincial Constitution Committee

d) Federal Constitution Committee

e) Federal Rights Committee

f) Advisory Committee

Answer Options:

1) a, b, c, d, e, f
2) a, b, d, e, f
3) a, b, c, d, e
4) a, b, c, d, f

---

34. चूकीची जोडी ओळखा. (समिती- अध्यक्ष)

1) ऑर्डर ऑफ बिझनेस कमिटी : डॉ. के. एम. मुन्शी
2) गृह समिती : सरदार वल्लभभाई पटेल
3) प्रांतिक घटना समिती : सरदार वल्लभभाई पटेल
4) संघराज्य घटना समिती : पं. जवाहरलाल नेहरू

Identify the wrong pair. (Committee- Chairman)

1) Order of Business Committee: Dr. K. M. Munshi
2) Home Committee: Sardar Vallabhbhai Patel
3) Provincial Constitution Committee: Sardar Vallabhbhai Patel
4) Union Constitution Committee: Pt. Jawaharlal Nehru

चाणक्य मंडल परिवार

35. खालीलपैकी कोणती भारतीय संविधानाची एकात्मिक वैशिष्टे आहेत ?

अ) स्वतंत्र न्यायपालिका

ब) सत्तेचे विभाजन

क) एकात्मिक न्यायपालिका

ड) संविधानाची लवचिकता

इ) राज्य प्रतिनिधित्वामध्ये असमानता

1) फक्त अ, ड, क
2) फक्त ब, ड, इ
3) फक्त क, ड, इ
4) फक्त अ, ब, क

Which of the following features are unitary features of the Indian Constitution?

a) Independent Judiciary

b) Division of Powers

c) Integrated Judiciary

d) Flexibility of the Constitution

e) Inequality of State representation

1) Only a, d, c
2) Only b, d, e
3) Only c, d, e
4) Only a, b, c

---

36. धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे

अ) राज्य हे एखाद्या विशिष्ट धर्माच्या विरोधी असेल

ब) राज्य हे धर्मानुकूल असते

क) राज्य हे कोणत्याही धर्मावर आधारलेले नसेल

ड) राज्याची कोणत्याही विशिष्ट धर्माशी निष्ठा नसेल

इ) राज्य हे धर्माच्या विरोधी नसेल

वरीलपैकी कोणता/ कोणते विधान/ विधाने बरोबर आहे/ आहेत ?

पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ
2) फक्त ब
3) फक्त ब, क आणि ड
4) फक्त क, ड आणि इ

Secular State means

a) the State is against a particular religion

b) the State is pro-religion

c) the State will not have any foundation of religion

d) the State does not owe loyalty to any particular religion

e) the State is not hostile to religions

Which of the statements given above is/are correct?

Answer Options:

1) Only a
2) Only b
3) Only b, c and d
4) Only c, d and e



चाणक्य मंडल परिवार

37. योग्य जोड्या जुळवा. (भारतीय संघराज्याविषयी)

| **व्यक्ती** | **कथने** |
|---|---|
| अ) ग्रॅनविल ऑस्टिन | i) एकात्मकतेकडे झुकणारे संघराज्य |
| ब) के. सी. व्हिअर | ii) वाटाघाटीचे संघराज्य |
| क) मॉरीस जोन्स | iii) निम-संघराज्यीय |
| ड) आयवर जेनिंग्ज | iv) सहकारी संघराज्य |

पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | ii | i |
| 2) | i | ii | iii | iv |
| 3) | i | ii | iv | iii |
| 4) | ii | i | iii | iv |

Match the correct pairs. (Regarding Indian Federalism)

| **Person** | **Statement** |
|---|---|
| a) Granville Austin | i) Federalism tending towards unity |
| b) K. C. Wheare | ii) Bargaining federalism |
| c) Morris Jones | iii) Quasi-federal |
| d) Ivor Jennings | iv) Cooperative Federalism |

Answer Options:

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | ii | i |
| 2) | i | ii | iii | iv |
| 3) | i | ii | iv | iii |
| 4) | ii | i | iii | iv |

---

38. 'भारतीय राज्यघटनेच्या अकराच्या अनुसूचीमध्ये खालीलपैकी कोणत्या विषयांचा समावेश होतो ?

1) नगरपालिकांचे अधिकार, प्राधिकार आणि जबाबदाऱ्या
2) पक्षांतराच्या कारणावरून अपात्र होण्यासंबंधी तरतुदी
3) राज्यसभेतील जागांची वाटणी
4) पंचायतीचे अधिकार, प्राधिकार आणि जबाबदाऱ्या

Which of the following subjects are included in the Eleventh Schedule of the Indian Constitution?

1) Powers, authority and responsibilities of Municipalities
2) Provisions as to disqualification on grounds of defection.
3) Allocation of seats in the Council of States
4) Powers, authority and responsibilities of Panchayats



चाणक्य मंडळ परिवार

39. राज्यघटनेच्या कोणत्या परिशिष्टामध्ये भारतातील घटकराज्यांची नावे व त्यांचा भौगोलिक विस्तार याबाबतच्या तरतूदी केल्या आहेत ?

1) पहिले
2) चौथे
3) पाचवे
4) सातवे

Which one of the following Schedules of the Constitution lists the names of Indian States and specifies their territories?

1) First
2) Fourth
3) Fifth
4) Seventh

---

40. तिसऱ्या परिशिष्टात कोणाच्या शपथांची प्रारूपे दिली आहेत?

अ) केंद्रीय मंत्री
ब) विधिमंडळांच्या निवडणुकीतील उमेदवार
क) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश
ड) भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक
इ) उच्च न्यायालयांचे न्यायाधीश

पर्यायी उत्तरे:
1) अ, ब, क, ड
2) अ, ब, ड
3) अ, क, ड
4) अ, ब, क, ड, इ

Whose forms of oaths are given in the third schedule?

a) Union Minister
b) Candidates in elections to legislatures
c) Judges of the Supreme Court
d) Comptroller and Auditor General of India
e) Judges of High Courts

Answer Options:
1) a, b, c, d
2) a, b, d
3) a, c, d
4) a, b, c, d, e

चाणक्य मंडल परिवार

41. भारतीय राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टाविषयी काय खरे नाही?

अ) राज्यघटनेतील कलम 342 ते 351 हे या परिशिष्टाशी संबंधित आहेत.

ब) यात सुरूवातीला 14 भाषांचा समावेश होता.

क) 21 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1967 नुसार सिंधी भाषेचा समावेश करण्यात आला.

ड) 71 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1991 नुसार कोकणी, मणिपुरी आणि नेपाळी या भाषांचा समावेश आठव्या परिशिष्टात करण्यात आला.

इ) 92 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2004 नुसार बोडो, डोंगरी, मैथिली आणि संथाली या भाषांचा समावेश आठव्या परिशिष्टात करण्यात आला.

फ) 96 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2012 नुसार ओरिया भाषेस ओडिया असे नाव देण्यात आले.

पर्यायी उत्तरे:

1) यापैकी नाही
2) फक्त क, फ
3) अ, ड, इ, फ
4) फक्त ड आणि इ

Which is not true about the Eighth Schedule of the Constitution of India?

a) Articles 342 to 351 of the Constitution relate to this Schedule.

b) It initially included 14 languages.

c) Sindhi language was included as per 21st Constitutional Amendment Act, 1967.

d) By the 71st Constitutional Amendment Act, 1991, Konkani, Manipuri and Nepali languages were included in the Eighth Schedule.

e) According to the 92nd Constitutional Amendment Act, 2004, Bodo, Dongri, Maithili and Santhali languages were included in the Eighth Schedule.

f) According to the 96th Constitutional Amendment Act, 2012 Oriya language was renamed as Odia.

Answer Options:

1) None of this
2) Only c, f
3) a, d, e, f
4) Only d and e

चाणक्य मंडल परिवार

42. परिशिष्ट आणि संबंधित कलमे यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| **परिशिष्ट** | **संबंधित कलमे** |
|---|---|
| a) परिशिष्ट VII | i) कलम 31 बी |
| b) परिशिष्ट V | ii) कलम 102 व 191 |
| c) परिशिष्ट IX | iii) कलम 244 |
| d) परिशिष्ट X | iv) कलम 246 |

पर्यायी उत्तरे:

1) अ- ii, ब- iii, क- iv, ड- i
2) अ- iii, ब- iv, क- i, ड- ii
3) अ- iv, ब- iii, क- ii, ड- i
4) अ- iv, ब- iii, क- i, ड- ii

Match the correct pairs of Schedule and its related articles.

| **Schedule** | **Related Articles** |
|---|---|
| a) Schedule VII | i) Article 31 (b) |
| b) Schedule V | ii) Article 102 and 191 |
| c) Schedule IX | iii) Article 244 |
| d) Schedule X | iv) Article 246 |

Answer Options:

1) a- ii, b- iii, c- iv, d- i
2) a- iii, b- iv, c- i, d- ii
3) a- iv, b- iii, c- ii, d- i
4) a- iv, b- iii, c- i, d- ii

चाणक्य मंडल परिवार

43. काँग्रेसच्या तज्ज्ञ समितीबाबत योग्य कथने ओळखा.

अ) 8 जुलै, 1946 रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने संविधान सभेसाठी साहित्य तयार करण्याच्या उद्देशाने तज्ञ समिती नेमली.

ब) जवाहरलाल नेहरू या समितीचे अध्यक्ष होते.

क) कृष्णा कृपलानी हे या समितीचे समन्वयक होते.

ड) एम. असफ अली, के. एम. मुन्शी, एन. गोपालस्वामी अय्यंगार, के. टी. शहा, डी. आर. गाडगीळ, हुमायून कबीर आणि के. संथानम हे या समितीचे सदस्य होते.

1) फक्त अ, ब, ड 2) फक्त ब, क
3) फक्त अ, क 4) वरीलपैकी सर्व

Select the correct statements about the Experts Committee of the Congress.

a) On 8 July 1946, the Indian National Congress appointed an Experts Committee for the purpose of preparing material for the Constituent Assembly.

b) Jawaharlal Nehru was a Chairman of that Committee,

c) Krishna Kriplani was convener of that Committee.

d) M. Asaf Ali, K. M. Munshi, N. Gopalaswami Ayyangar, K. T. Shah, D. R. Gadgil, Humayun Kabir and K. Santhanam were members of this committee.

1) Only a, b, d 2) Only b, c
3) Only a, c 4) All of the above

---

44. खालीलपैकी कोणते भारतीय राज्यघटनेचे महत्वाचे वैशिष्ट/ष्ट्ये आहेत ?

अ) अध्यक्षीय शासनपद्धती
ब) प्रभावशाली केंद्रशासन
क) दुहेरी न्यायपालिका
ड) द्विगृही कायदेमंडळ

योग्य पर्याय निवडा:

1) फक्त अ 2) ब आणि ड
3) ब, क, ड 4) वरील सर्व

Which of the following is/are the salient feature/s of the Indian Constitution ?

a) Presidential form of Government
b) Dominant Central Government
c) Dual Judiciary
d) Bicameral Legislature

Select correct options:

1) Only a 2) b and d
3) b, c, d 4) All the above

45. जवाहरलाल नेहरू यांनी 1946 मध्ये जो 'उद्दिष्टांचा ठराव' मांडला त्याच्या मध्ये खालीलपैकी कोणता भाग नव्हता ?

1) भारत हे स्वतंत्र, सार्वभौम प्रजासत्ताक असेल.
2) कोणत्याही विशिष्ट वर्गांसाठी खास संरक्षण दिले जाणार नाही.
3) स्वतंत्र भारताची सर्व सत्ता व अधिकार जनतेकडून प्राप्त होतील.
4) भारताच्या सर्व जनतेला कायद्यापुढील समता दिली जाईल.

Which one of the following was not a part of the 'Objectives Resolution' moved by Jawaharlal Nehru in 1946?

1) India as an Independent, Sovereign Republic.
2) No safeguards will be provided to any particular classes.
3) All powers and authority of independent India are derived from the people.
4) All people of India shall be provided equality before the law.

---

46. खालील विधाने विचारात घ्या.

अ) केंद्र व राज्य यांमधील कायदेविषयक संबंध राज्यघटनेच्या अकराव्या भागातील कलम 245 ते 255 मध्ये सांगितलेले आहेत.

ब) भारतीय राज्यघटनेच्या अकराव्या भागातील कलम 256 ते 263 केंद्र व राज्य यांच्यामधील प्रशासनिक संबंधांविषयी आहेत.

पर्यायी उत्तरे:

1) फक्त अ बरोबर
2) फक्त ब बरोबर
3) अ आणि ब चूक
4) अ आणि ब बरोबर

Consider the following statements.

a) The legislative relationship between the Center and the States is laid down in Articles 245 to 255 of the Eleventh Part of the Constitution.

b) Articles 256 to 263 of the eleventh part of the Constitution of India deal with administrative relations between the Center and the States.

Answer Options:

1) Only a is correct
2) Only b is correct
3) a and b are incorrect
4) a and b are correct



चाणक्य मंडल परिवार

47. अचूक विधाने ओळखा.

अ) राज्यघटनेच्या कलम 326 मध्ये सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे तत्व नमूद केले आहे.

ब) सार्वजनिक प्रौढ मताधिकारामुळे अल्पसंख्यांकांना त्यांच्या हिताचे रक्षण करणे शक्य होते.

क) भारत सरकार कायदा, 1919 अंतर्गत भारतात प्रथमच महिलांना मतदानाचा हक्क देण्यात आला.

ड) महिलांना मताधिकार देणारा न्यूझीलंड जगातील पहिला देश आहे.

1) फक्त अ    2) ब आणि ड

3) अ, ब, क    4) वरील सर्व

Identify the correct statements.

a) Article 326 of the Constitution lays down the principle of adult suffrage.

b) Public adult suffrage enables minorities to protect their interests.

c) Women were given the right to vote for the first time in India under the Government of India Act, 1919.

d) New Zealand was the first country in the world to give women the right to vote.

1) Only a    2) b and d

3) a, b, c    4) All of the above

---

48. डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या मते _______ हे भारतीय राज्यघटनेचे 'नावीन्यपूर्ण वैशिष्ट्ये' आहे.

1) कलम 32

2) राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे

3) राज्यघटनेचा सरनामा

4) मुलभूत कर्तव्ये

According to Dr. B. R. Ambedkar, .... are the 'innovative features' of the Indian Constitution.

1) Article 32

2) Directive Principles of State Policy

3) Preamble of Constitution

4) Fundamental Duties

---

चाणक्य मंडल परिवार

49. खालीलपैकी कोणते/ ती भारतीय राज्यघटनेतील संघराज्यात्मक वैशिष्ट्ये नाही/ नाहीत ?

अ) लिखित घटना

ब) घटनेची सर्वोच्चता

क) राष्ट्रपतीचा राज्य विधेयकावरील नकाराधिकार

ड) स्वतंत्र न्यायव्यवस्था

योग्य पर्याय निवडा:

1) फक्त क

2) ब आणि क

3) फक्त ब

4) यापैकी नाही

Which of the following is/are not federal feature/s of the Indian Constitution?

a) Written constitution

b) Supremacy of Constitution

c) President's veto power on state bills

d) Independent Judiciary

Select correct options:

1) Only c

2) b and c

3) Only b

4) None of this

---

50. कोणत्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने 'संघराज्यवाद' घटनेचे मुलभूत वैशिष्ट्ये असल्याचे सांगितले आहे?

1) केशवनंद भारती खटला (1973)

2) एस. आर. बोम्मई खटला (1994)

3) मनेका गांधी खटला (1978)

4) शंकरी प्रसाद खटला (1951)

In which of the following case, Supreme Court decided that 'federalism' is the basic structure of the constitution?

1) Kesavananda Bharati Case (1973)

2) S. R. Bommai Case (1994)

3) Maneka Gandhi Case (1978)

4) Shankari Prasad Case (1951)

चाणक्य मंडल परिवार

# चाणक्य मंडल परिवार

प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT000
**BOOKLET No.**

उत्तरपुस्तिका

एकूण प्रश्न : 50

वेळ : 1 (एक) तास

**POLITY**

एकूण गुण : 100

| Q. | A. | Q. | A. | Q. | A. | Q. | A. | Q. | A. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 11 | 2 | 21 | 3 | 31 | 1 | 41 | 3 |
| 2 | 1 | 12 | 4 | 22 | 2 | 32 | 1 | 42 | 4 |
| 3 | 3 | 13 | 1 | 23 | 4 | 33 | 1 | 43 | 4 |
| 4 | 3 | 14 | 3 | 24 | 1 | 34 | 2 | 44 | 2 |
| 5 | 1 | 15 | 2 | 25 | 2 | 35 | 3 | 45 | 2 |
| 6 | 4 | 16 | 4 | 26 | 1 | 36 | 4 | 46 | 4 |
| 7 | 2 | 17 | 3 | 27 | 3 | 37 | 1 | 47 | 4 |
| 8 | 4 | 18 | 1 | 28 | 4 | 38 | 4 | 48 | 2 |
| 9 | 3 | 19 | 1 | 29 | 3 | 39 | 1 | 49 | 1 |
| 10 | 2 | 20 | 4 | 30 | 4 | 40 | 4 | 50 | 2 |

चाणक्य मंडल परिवार